महाराष्ट्र पोलीस

**पोलीस अधीक्षक कार्यालय नाशिक ग्रामीण,**

पोलीस मुख्यालय, आडगाव नाशिक - पीन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७००

**E.mail - sp.nashik.r@mahapolice.gov.in**

---

**प्रेसनोट** दिनांक : ०५/०८/२०२३

# नाशिक ग्रामीण पोलीसांचे आता अंमली पदार्थ विरोधी अभियान

---

दिनांक ०६ ते ३१ ऑगस्ट २०२३ दरम्यान नाशिक ग्रामीण पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधी अभियान हाती घेतले आहे. मागील काही महिन्यांपासून नाशिक ग्रामीण पोलिसांनी अवैध व्यवसायांविरुद्ध अभियान छेडले आहे.

सुरुवातीस अवैध दारू उत्पादन रोखण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांनी मासरेडचे आयोजन केले होते. सदर कारवाईदरम्यान दारू उत्पादनांचे ठिकाणी धाडी टाकून तयार मालासह गावठी मद्य निर्मिती करण्यासाठी आवश्यक असणा-या गुळ, नवसागर अशा साधनांची देखील जप्ती करण्यात आली होती. चालू वर्षात आज पावतो ग्रामीण पोलीसांनी दारुबंदी कायद्याखाली एकूण २८४८ केसेस केल्या असून त्यात ४,०६,१०,६१२/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. अवैध दारू निर्मिती, वाहतूक व विक्री यांचेविरुद्ध सातत्याने कारवाई केल्यानंतर मागील दोन महिन्यांपासून नाशिक ग्रामीण पोलीसांनी गुटखा विरोधी अभियान राबविले होते. सदर अभियानादरम्यान पोलीसांनी गुटख्याची निर्मिती, वाहतूक व विक्री करणा-या १७८ इसमांविरुध्द १६९ गुन्हे नोंद करून दोन कोटीहून अधिक रकमेचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

दिनांक ०६ ऑगस्ट २०२३ पासून नाशिक ग्रामीण पोलीसांनी अंमली पदार्थ विरोधी अभियान हाती घेतले आहे. सदर कारवाईदरम्यान, जिल्ह्यातील अंमली पदार्थांचे रॅकेट शोधून त्यांची पाळेमुळे उध्वस्त करणे हा पोलीसांचा हेतू आहे. यासोबत असेही स्पष्ट करण्यात येते की, यापूर्वी हाती घेतलेले अवैध व्यवसाय निर्मूलनाचे काम सातत्याने सुरू राहील. जिल्ह्यातील सर्वच अवैध व्यवसाय नेस्तनाबूत करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांचे प्रयत्न सुरु आहेत.

नागरिकांनी आपल्याकडील उपयुक्त माहिती अवैध व्यवसाय विरोधी हेल्पलाईन क्रमांक ६२६२(२५)६३६३ यावर व्हॉटस्अ‍ॅपच्या माध्यमातून द्यावी, माहिती देणा-याचे नांव देखील विचारण्यात येणार नाही. जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या अवैध व्यवसायांचे निर्मूलन करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.